दै. लोकमत दि. ०२/०१/२०२२

# नववर्षाचा झिंगाट; पोलिसांच्या दंडुक्याने १६० जणांची उतरवली

## नाकाबंदी : रात्रभर पोलिसांकडून शहरभरात गस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : कोरोनाचा धोका कमी झाला असला तरी, ओमायक्रॉनचे संकट मात्र पुढे आले आहे. त्यामुळे प्रशासनाने कठोर निर्बंध लावले आहेत. थर्टी फर्स्टच्या पार्टीवरही बंधने घालण्यात आली होती. त्यात शुक्रवारी रात्रीपासूनच जिल्हाभरात पोलिसांनी मद्यपींना धडा शिकविण्यासाठी तपासणी नाके लावले होते. या तपासणीत जवळपास १६० जणांची झिंग पोलिसांनी उतरविली. यावेळी अनेकांना दंडही ठोठावण्यात आला आहे. किरकोळ घटना वगळता जिल्ह्यात थर्टी फर्स्टला कुठेही राडे झाले नाहीत.

पोलिसांनी शहर व जिल्ह्यात तपासणी नाके लावून मद्यपी वाहन चालकांची तपासणी केली. पहाटेपर्यंत पोलिस रस्त्यावरच होते. त्यात हॉटेल आणि बारमध्येही नागरीकांची वर्दळ कमीच होती. रात्री अकरा वाजताच रस्त्यावर शुकशुकाट होता. रात्री उशिरापर्यंत सुरु असलेल्या काही हॉटेल चालकांनाही पोलिसांनी तंबी दिली. त्यामुळे कुठेही अनूचित प्रकार घडला नाही. विना परवाना वाहन चालकांनाही यावेळी दंड ठोठविण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

### थोडी थोडी पिया करो

मद्यपान करुन वाहन चालविल्यास पोलिसांकडून कारवाई होण्याच्या शक्यतेने अनेकांनी पार्सल नेवून घरीच पार्टीचा बेत आखला होता. तर बाहेर पार्ट्या करणारेही साडे बाराच्या आत घरात पोहचले.



### ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह

मद्यपान करुन वाहन चालविणारेही पोलिसांच्या रडारवर होते. ब्रिथ अनालायझरद्वारे प्रत्येक वाहनधारकांची तपासणी करण्यात येत होती. मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्यांना दंड ठोठावला आहे.

### १२ हॉटेलांवर केली कारवाई

- शहर आणि जिल्ह्यात उशिरापर्यंत सुरु असलेल्या बारा हॉटेल चालकांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. काही जणांना तंबीही देण्यात आली.

### १००० पोलिसांचा ताफा



जिल्ह्यात ठिकठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आले होते. या ठिकाणी प्रत्येक वाहनधारकाची कसून तपासणी करण्यात येत होती. तसेच चार चाकी वाहनेही तपासण्यात आली. त्यासाठी मोठा फौज फाटा रस्त्यावर उतरला होता.

### पोलीस प्रमुखांचा कोट

जिल्ह्यात थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रत्येक ठिकाणी त्यासाठी चेकपोस्ट लावल्या होत्या. तपासणीत अनेकांवर कारवाई करण्यात आली.- **विजय कबाडे**, प्रभारी पोलीस अधीक्षक

---

→ दै. पुढारी दि ०२/०१/२०२२

# गावठी पिस्तूल, तलवारीसह पाच लाख ७६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नरसी, पुढारी वृत्तसेवा :** कारमध्ये विना परवाना गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या एका तरुणाला रामतीर्थ पोलिसांनी सापळा लावून मोठ्या शिताफीने जेरबंद केले . पोलिसांनी सदर युवकाकडून एक गावठी पिस्तूल, चार जिवंत काडतुसे, एक तलवार आणि एक कार असा एकूण पाच लाख ७६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई ३१ डिसेंबरच्या रात्री साडेबाराच्या सुमारास नरसी येथे करण्यात आली.



नायगाव येथील एक युवकाने मध्यरात्रीच्या सुमारास नरसी पेट्रोलपंपावर वाद करून तलवार काढून दाखविली. त्यानंतर तो कारने नरसी ... सपोनि विजय जाधव यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी नरसी चौकात मिळालेल्या माहितीनुसार कारची तपासणी केली. यावेळी चालकाच्या सीटखाली एक गावठी पिस्तूल, चार जिवंत काडतुसे व एक तलवार आढळून आली. या प्रकरणी ... नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार लतिफ शेख हे करीत आहेत. सदर युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून नायगाव न्यायालयात हजर केले असता ...